

On ocassion of Inauguration of Pulse Polio campaign in P.H.C. Anadur

Giving pulse drop to children





Meeting with Shri. Anna Hajare in Ralegan Shidhi

Tree Plantation on College campus





Govt. of India, Ministry of Youth Affairs & Sports, RGNIYD & NSS, RC Pune

**TOT on Social Harmony & National Unity**

28/3/2011 to 1/4/2011

Blood donation





Participation in rally on Republic day with students

Give a lecture on Stand up & speak out to students of NSS





At the time of Blood donation

At the time of meeting of District co-ordinator
& area co-ordinator about Annual planing



## बावीच्या रणरागिनींनी पदर खोचताच

दै. पुढारी दि. २८/११/२०१२

# बाटली आडवी तर जुगार हद्दपार

बार्शी : प्रशांत काळे

**शहरापासून १२ कि. मी. अंतरावर असलेल्या व ढाळे पिंपळगाव मध्यम प्रकल्पाच्या काठावर वसलेल्या बावी (आगलावे) या गावात ७ रणरागिनींनी दारू, जुगारबंदी दक्षता समिती स्थापन करून मागील एक महिन्यांपासून तळीरामांना धडा शिकवला आहे. जुगार बंद करून गाव विकासाकडे नेण्याचा व तरुणांना स्फूर्ती देण्याचा जणू ध्यासच या रणरागिनींनी घेतला आहे.**

बार्शी तालुक्यातील ग्रामपंचायतीपासून ते विधानसभा निवडणुकीपर्यंत बावी हे गाव आजपर्यंत शासनाने कायम अतिसंवेदनशील म्हणून घोषित केले आहे. अशी या गावाची प्रतिमाच बदलण्याचा विडा आता या गावातील महिलांनी उचलला असून ग्रामपंचायत सदस्यांसह ग्रामस्थही त्यांच्या मागे ठामपणे उभे राहिले आहेत.

सुमारे ३ हजार ५०० लोकवस्तीचे बावी हे गाव ढाळेपिंपळगाव प्रकल्पाचे पाणी शेतीला मिळाल्याने आर्थिकदृष्ट्या चांगलेच सुधारले आहे. मात्र एका बाजूने सुबत्ता वाढत असताना काही कारणांनी गावाची शांतता मात्र भंग झाली आहे. गावातील काही महाभाग दारूत तर काही जुगारात बुडाल्याने सायंकाळच्या वेळेस गावाला एक वेगळेच स्वरूप प्राप्त होऊ लागले.

अशा या पार्श्वभूमीवर गावामध्ये सुरू असलेल्या या प्रकारांना आळा कसा घालायचा, प्रथम पाऊल कोणी उचलायचे, असा प्रश्न थेट ग्रामसभेत उपस्थित झाला आणि गावाच्या सर्वांगीण विकास व व्यसनमुक्तीसाठी सात महिलांनी पुढे सरसावून दक्षता समिती स्थापन करण्याचा सल्ला दिला. निर्मला शिरसट, राजश्री मिठे, नयना आगलावे, माधुरी कुलकर्णी, सविता फोपले, काविरा आगलावे, संगीता आगलावे, पुष्पा फोपले अशी या सात रणरागिनींची दारू-जुगार बंदीची दक्षता समिती स्थापन झाली आणि आश्चर्य म्हणजे एका महिन्यात दारूची बाटली आडवी झाली तर जुगाराने गावातून काढता पाय घेतला. यासंदर्भात आमच्या

पान २ वर ▶



याच त्या बावीच्या रणरागिनी.

### महिलांचा पुढाकार उल्लेखनीय : सरपंच

दारू आणि जुगारामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले व होत आहेत. तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात व्यसनाधिनतेकडे वळू लागला आहे. या पार्श्वभूमीवर महिलांनी निर्णय घेतला आणि त्यांना सर्वांनीच पाठिंबा दिला. पक्षीय मतभेद न ठेवता सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला या दक्षता समितीच्या पाठिशी भक्कमपणे उभ्या आहेत, असे बावीचे सरपंच गजेंद्र काकडे यांनी सांगितले.

### इतर गावांपुढे आदर्श

बावी येथील महिलांनी उचललेले हे पाऊल समाजासाठी निश्चितच लाभदायक आहे. त्यांचा फोन येताच त्वरित पोलिस बंदोबस्त पाठवण्यात येतो. दारू आणि जुगार बंद करून महिलांनी इतर गावांपुढे आदर्श निर्माण केला आहे, असे पांगरीचे सहायक पोलिस निरीक्षक शरद म्हेमाने यांनी सांगितले.

### दारुड्यांच्या धमक्या

मद्यपी दारूच्या नशेत महिलांना अडचणीत आणून आत्महत्या करू, अशा धमक्या देत आहेत. पण पूर्ण ग्रामपंचायत त्यांच्या पाठीमागे उभी आहे, असे बावीचे उपसरपंच प्रा. सुर्यकांत आगलावे यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांनी मोघा गावातील स्वच्छतेसह श्रमदानातून बांधले दोन वनराई बंधारे

प्रतिनिधी । लोहारा




शंकरराव जावळे पाटील महाविद्यालयाचे मोघा येथे शिबिर पार पडले.

लोहारा येथील शंकरराव जावळे पाटील वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वार्षिक शिबिराचा समारोप सोहळा गुरुवारी (दि.४) संपन्न झाला. २९ डिसेंबर २०१७ ते ४ जानेवारी २०१८ कालावधीत हे शिबिर तालुक्यातील मोघा येथे आयोजित केले होते. या शिबिरांतर्गत विद्यार्थ्यांनी गावातील स्वच्छता करून श्रमदानातून दोन वनराई बंधारे तयार केले.

शिबिरादरम्यान रक्तदान शिबिर, आरोग्य व पशुचिकित्सा शिबिर यासह अंधश्रद्धा निर्मूलन संदर्भात बाबा हालकुडे यांनी केलेले विविध प्रयोग, पाणी फाउंडेशनचे उमेश मडके यांनी चित्रफितीच्या माध्यमातून जलसंवर्धनाविषयी मार्गदर्शन, कीर्तनकार ऋषिकेश जोशी यांनी कीर्तनाच्या माध्यमातून स्वछता व व्यसनाविषयी प्रबोधन, अनिरुद्ध पिंपळे यांनी सेंद्रिय शेती विषयी चित्रफितीच्या माध्यमातून मार्गदर्शन आदी अनेक कार्यक्रम संपन्न झाले. शिबिराचा समारोप कार्यक्रमात प्रा. सूर्यकांत आगलावे यांनी विद्यार्थ्यांना वाईट व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. एम. एल. सोमवंशी हे होते. प्रास्ताविक प्रा. आर. एस. धप्पाधुळे यांनी केले. सूत्रसंचालन श्रीशैल्य परीट याने तर परमेश्वर गिराम याने आभार मानले. यावेळी प्रा. डी. एन.कोटरंगे, प्रा. आर. एम. सूर्यवंशी, प्रा. डॉ. एस. व्ही. सोनवणे, प्रा. व्ही.डी. आचार्य, प्रा. पी. के. गायकवाड, एस. एम. देशमुख, प्रवीण पाटील, प्रकाश राठोड, एस. एम.फुकटे यांच्यासह रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

दैनिक दिव्यमराठी दि. ८/१/२०१८



# हॅलो मेडिकल फाउंडेशनचे कार्य कौतुकास्तपद : कोलते

प्रतिनिधी । अणदूर

हॅलो मेडिकल फाउंडेशन ही संस्था आरोग्यासोबतच शिक्षणक्षेत्रात करत असलेले कार्य कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांकरीता ग्रामीण विज्ञान केंद्राच्या माध्यमातून राबवत असलेल्या विविध उपक्रमांचा लाभ शिक्षकांनी विद्यार्थ्यांला मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. संजय कोलते यांनी केले.

हॅलो मेडिकल फाउंडेशन अंतर्गत ग्रामीण विज्ञान केंद्र, विज्ञान वाहिनी संस्था पुणे व दुर्गादेवी चॅरिटेबल ट्रस्ट पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विज्ञान जत्रेच्या समारोप कार्यक्रमात सीईओ डॉ. कोलते बोलत होते. या जत्रेचे उद्घाटन अंनिसचे प्रा. माधव बावगे यांच्या हस्ते व प्राचार्या डॉ. मीना जाधव, राजकुमार स्वामी यांच्या उपस्थितीत झाले. जिल्हा बँकेचे संचालक सुनील चव्हाण यांच्या अध्यक्षस्थानी होते. या विज्ञान जत्रेमध्ये अणदूर व परिसरातील ६० शाळांमधून ३८० विद्यार्थी व ७० शिक्षकांनी सहभाग नोंदविला. यावेळी डॉ. कोलते यांच्या हस्ते ग्रामीण विज्ञान केंद्राकडून खुदावाडी येथील त्र्यंबक दगडू गायकवाड या गरीब विद्यार्थ्याला अभियांत्रिकी शिक्षणासाठी ४० हजार रुपयांच्या मदतीचा धनादेश देण्यात आला. यावेळी डॉ. अशोक कदम, डॉ. एम. बी. बिराजदार, डॉ. विश्वास माने, प्रा. आगलावे, मनोहर घोडके, प्रदीप बिराजदार, सचिन गुड्ड आदींसह सुरेश कंदले, भगीरथ कुलकर्णी, मधुकरराव कुलकर्णी, गोपाळ कुलकर्णी, उमाशंकर चिंचोले आदी उपस्थित होते. प्रास्ताविक बसवराज नरे यांनी, सूत्रसंचालन प्रसन्न कंदले यांनी व आभार बालाजी जाधव यांनी मानले.

दैनिक दिव्यमराठी दि. १०।०९।२०१८

**श्रमदान शिबिर** आमदार बसवराज पाटील यांचे कार्यक्रमात मत, शिबिरात विद्यार्थ्यांनी श्रमदानातून गावातील स्वच्छता केली

# सुसंस्कारी समाजासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा

प्रतिनिधी । उमरगा

देशाला सशक्त व मजबूत करण्यासाठी एकात्मता, पाणी व पर्यावरणाचे संवर्धन, स्वच्छता आणि महिलांची सुरक्षितता आदिंसह समाजातील मतभेदाचे निर्मूलन करून सुसंस्कारीत समाज घडविण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा, असे मत औश्याचे आमदार बसवराज पाटील यांनी व्यक्त केले.

लोहारा तालुक्यातील तोरंबा येथे श्री माधवराव पाटील महाविद्यालय मुरुमच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठी युवा विशेष शिबिराचे सोमवारी (दि. ८) समारोप करण्यात आला. त्यावेळी आमदार पाटील बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष बापूराव पाटील, पंचायत समितीच्या सभापती ज्योती पत्रिके, उपसभापती नमीता पाटील, नगराध्यक्षा अनिता अंबर, जिप सदस्य शोभा तोरकडे, हेमलता रणखांब, विठ्ठलसाईचे संचालक दिलीप भालेराव, तालुकाध्यक्ष अमोल पाटील, रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे, धोंडीराम चव्हाण, तात्याराव चव्हाण, तोरंबा सरपंच वर्षा चव्हाण, उपसरपंच स्वप्नील चव्हाण, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, तानाजी माटे आदींची उपस्थिती होती. पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले की, नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. लोकसहभागातून अधिकाधिक जलसंधारणांच्या कामासाठी युवकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. यावेळी



डॉ. सूर्यकांत आगलावे, माजी नगराध्यक्ष प्रा. सुधीर अंबर, अमोल पाटील, योगेश गुरव आदिंची भाषणे झाली. प्रा. दिनकर बिराजदार, बाबांसाहेब चव्हाण, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, डॉ. राम बजगिरे, डॉ. जयश्री सोमवंशी, ग्रामसेवक एम. टी. जगताप, शाळेचे मुख्याध्यापक कुलकर्णी, मारुती इंगळे, दिलीप घाटे, मशाक कागदी आदिंनी शिबिरासाठी पुढाकार घेतला. प्रा. सुभाष हुलपल्ले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विलास खडके यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक दिव्यमराठी दि. ११।०९।२०१८

# उदतपूर येथे रासेयो स्वच्छ ग्राम शिबिराचा शुभारंभ

प्रतिनिधी । लोहारा

तालुक्यातील उदतपूर येथे माकणी येथील बी. एस. एस. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वच्छ ग्राम व जलसंवर्धनासाठीचे विशेष युवा शिबिराचे उद्घाटन भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. सूर्यकांत आगलावे, महाविद्यालयाचे प्राचार्य शेषेराव पवार, डॉ. एच. एन. रेडे, सरपंच माधवराव पाटील, पोलिस पाटील माधवराव पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय याची सविस्तर माहिती सांगण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एच. एन. रेडे यांनी केले. सूत्रसंचालन के. ए. लोमटे यांनी तर डॉ. एस. ई. मुंढे यांनी आभार मानले. कार्यक्रमास गावातील नागरिक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. शिबिर कालावधीत विद्यार्थ्यांच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येणार आहेत.

2021-22 Majhi Vasundhara2

Government of Maharashtra
Environment and Climate Change Department

MAJHI VASUNDHARA
# MITRA

CERTIFIED

'Mazi Vasundhara Mitra'

Name : DR. SURYAKANT DATTATRAY AGALAVE

Date : 06/09/2021

**Aaditya Thackeray**
Minister
Tourism, Environment and Climate Change & Protocol


ज्येष्ठ नागरीक
प्रभात मंडळ
सामाजिक संस्था, अणदूर



दुरितांचे तिमिर जावो ।
शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर संचलित
जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
अणदूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद - ४१३ ६०३
राष्ट्रीय सेवा योजना
आज़ादी का अमृत महोत्सव
आजादी का अमृत महोत्सव
स्वच्छ भारत अभियान
५ जून जागतिक पर्यावरण दिन


जवाहर


OF
GEOGRAPH








दै. लोकमत दि. १०/११/२०१०

# अभिनंदन ! अभिनंदन !! अभिनंदन !!!


बार्शी तालुक्यातील बावी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी काँग्रेसचे **मा. गजेंद्र माधव काकडे** यांची तर उपसरपंचपदी **मा. सूर्यकांत दत्तात्रय आगलावे** यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन !

माजी आमदार




मा.राजेंद्र राऊत

नूतन सरपंच




मा.गजेंद्र काकडे

नूतन उपसरपंच



मा.सूर्यकांत आगलावे

विजयाचे शिल्पकार



श्री.मच्छिंद्र फापले (मेजर)

**शुभेच्छुक**

- श्री. लहु भागवत आगलावे (सदस्य)
- फत्रोद्दीन शेख (सदस्य)
- सौ.संगीता बाळासाहेब पाटील (सदस्या)
- सोपान सोमा काळे (सदस्य)
- गणेश नागनाथ निर्मळ (सदस्य)
- सौ.ज्योती उमेश ठाकर (सदस्या)

सौजन्य

**राजाभाऊ राऊत मित्रमंडळ बावी (आ.), ता.बार्शी**
**ग्रामपंचायत बावी (आ.), ता.बार्शी**

---

दै. पुढारी दि. २०/११/२०१२

पान १ वरून

## बाटली आडवी तर जुगार हद्दपार

प्रतिनिधीने या महिलांशी संपर्क साधला असता सध्याच्या व मागील परिस्थितीबाबत या महिला अगदी भरभरुन बोलत होत्या. एखाद्या अजगराने आपल्या भक्ष्याला विळखा घालावा त्याप्रमाणे दारु व जुगाराने गावाला विळखा घातला होता. अनेकजण सकाळी चहाऐवजी दारू प्यायला पसंती द्यायचे तर काहीजण रात्री उशीरापर्यंत जुगारात दंग व्हायचे. हे सर्व प्रकार सध्या या महिलांनी बंद पाडले आहेत. आता गावात एखादा दारू पिऊन आला, हे समजताच समितीच्या सदस्या त्याला पकडून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आणतात, आणि सर्वांसमोर त्याला चपलांचा चोप देतात. आतापर्यंत पाचजणांना हा प्रसाद देण्यात आला आहे, अशीही माहिती या महिलांनी दिली. यापूर्वी गावात पाच ठिकाणी दारूविक्री सुरू होती, तर जुगारात दररोज दहा हजारापेक्षा जास्त उलाढाल होत होती. यामुळे अनेकांचे संसार अडचणीत आले होते. आता दारूविक्री व जुगार बंद केल्याने अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे, असेही या महिलांनी अभिमानाने सांगितले. या महिलांना सरपंच गजेंद्र काकडे, उपसरपंच प्रा. सुर्यकांत आगलावे, तंटामुक्तीचे अध्यक्ष दिलीप पाटील, ग्रामविकास अधिकारी डी.के.कांबळे, सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी पाठिंबा दिला असून त्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले आहे.

**ग्रामसभेत आवाहन करणार** : बावी (आ) येथील खंडोबा यात्रा १७ ते १९ डिसेंबर अशी तीन दिवस भरणार आहे. या यात्रेपूर्वी ग्रामसभा घेऊन क्रांतीकारक निर्णय घेण्यात येणार असून यात्रा काळात गावात कोणीही बाहेरगांवाहून दारू आणायची नाही, अशा आशयाचा डिजिटल ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात येणार आहे. ग्रामस्थ व त्यांच्या सर्व नातेवाईकांनाही याबाबत सूचना देण्यात येणार असल्याचे यावेळी या महिलांनी सांगितले.